प्रेस नोट दि - ०७/०५/२०१९

## सख्या भावाच्या घरात घरफोडी चोरी करणारा जेरबंद दोन लाख सत्तर हजाराचा ऐवज हस्तगत

श्री. मोसिन शफी शेख वय - २८ रा – प्लॅट नं – ४०३ इब्राहिम हनक्लेव्ह बिल्डिंग सर्व्हे नं – ४६ टेम्पल टॉवर कोंढवा खुर्द पुणे मुळ रा - सर्व्हे नं १२ लक्ष्मीनगर येरवडा पुणे **यांचे घर कुलुप लावुन बंद असताना दिनांक – १३/०५/२०१९ रोजी ते दिनांक – ०१/०६/२०१९ रोजी दुपारी १५/०० वा चे दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने बनावट चावीच्या सहाय्याने घराचे कुलुप उघडुन आत प्रवेश करुन घरातील लाकडी कपाट व आतील ड्रॉवरचे लॉक बनावट चावीच्या सहने उघडुन त्यामधील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा दोन लाख अकरा हजाराचा माल घरफोडी चोरी करुन चोरुन नेला आहे. त्याबाबत कोंढवा पोलीस स्टेशन गु र नं – ४८०/२०१९ भा दं वि कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल आहे.**

**गुन्हे शाखा युनिट – ३ पुणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी हे गुन्हयाचा तपास करत असताना पोलीस कर्मचारी विल्सन डिसुझा यांना त्यांचे खब-याकडुन माहीती मिळाली की फिर्यादी यांचा सख्खा भाऊ अरिफ** शेख यानेच सदर गुन्हा केला आहे व तो चोरलेले सोन्याचे विकण्यासाठी कोळसे गल्ली कॅम्प पुणे येथे येणार आहे. अशी माहीती मिळाल्यावरुन पोलीसांनी कोळसे गल्ली लष्कर कॅम्प पुणे येथे सापळा रचुन संशयीत इसम अरिफ शफी शेख वय-३६ रा - सर्व्हे नं -४२ बाबुभाई मॉलीशवाला जवळ लिमरा क्लासिक पाचवा मजला प्लॅट नं - ५०१ कोंढवा बु पुणे यास दिनांक – ०३/०६/२०१९ रोजी पकडले आहे. त्याचेकडे प्राथमिक तपास केला असता प्रथम त्याने पोलीसांना काहीच माहीती दिली नाही. नमुद आरोपी यास मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी लष्कर न्यायालय पुणे यांचे न्यायालयात हजर केले असता त्याची दिनांक – ०७/०६/२०१९ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर करण्यात आलेली होती. पोलीसांनी त्याचेकडे बारकाईने सखोल तपास केला असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. “ माझेवर बरेच कर्ज झाले आहे ते फेडण्यासाठी मी भावाचे घरी चोरी केली आहे ” असे सांगीतले. त्याचे ताब्यातुन गुन्हयातील चोरीस गेलेले नव्वद ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने दोन लाख सत्तर हजार रुपये किंमतीचे जप्त करण्यात आलेले आहे.

अशाप्रकारे पोलीसांनी सख्खा भाऊ पक्का वैरी असलेल्या आरोपीस गुन्हा दाखल झाल्यापासुन चोवीस तासाच्या आत पकडले आहे व गुन्हा उघडकीस आणलेला आहे. आरोपीने अशाप्रकारे बनावट चावीने कुलुपे उघडुन आणखी घरफोडी चोरीचे गुन्हे केल्याचा संशय असुन त्याबाबत पोलीस तपास करत आहेत.

सदरची कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे अपर पोलीस आयुक्त श्री अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. संभाजी कदम, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे - १ पुणे श्री. समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट - ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोकाशी, पोलीस उप निरी श्री. संजय गायकवाड, किरण अडागळे व पथकातील पोलीस कर्मचारी विल्सन डिसोझा, सचिन गायकवाड, मच्छिंद्र वाळके, गजानन गानबोटे, दत्तात्रय गरुड, दिपक मते, सुजित पवार, संदीप राठोड यांनी केली आहे. गुन्हयाचा पुढील अधिक तपास पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड हे करीत आहेत.

(राजेंन्द्र मोकाशी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा युनिट - ३ पुणे शहर